# जिल्हा परिषद, चंद्रपूर

जननी सुरक्षा योजना

## ◆ योजनेचे नाव

जननी सुरक्षा योजना

## ◆ योजनेचा उद्दिष्ट आणि लाभ

राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील व अनुसुचित जाती व जमातीच्या महिलांचे आरोग्य संस्थामध्ये होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण वाढविणे व माता मृत्यु व अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करणे.

◆

**₹ 700**

ग्रामीण भागातील रहिवासी लाभार्थी संस्थेत प्रसुतीसाठी

(प्रसूतीनंतर सात दिवसांत)

**₹ 600**

शहरी भागातील रहिवासी लाभार्थी संस्थेत प्रसुतीसाठी

(प्रसूतीनंतर सात दिवसांत)

**₹ 500**

घरी प्रसूती झाल्यास

(अपवादात्मक स्थितीमध्ये)

**₹ 1500**

सिझेरियन शस्त्रक्रीया

(रुग्णालयातील पावत्या आवश्यक)

## ◆ पात्रता निकष

**अ.** ग्रामीण भागातील सदर गर्भवती महिला ही दारिद्रय रेषेखालील असावी. दारिद्रय रेषेखालील असल्याचे कागदपत्र उपलब्ध नसल्यास संबंधित तहसिलदार / तलाठी किंवा ग्रामपंचायतीने दिलेले प्रमाणपत्र / पुरावा ग्राह्य धरण्यात यावा.

**ब.** शहरी भागातील गर्भवती महिला दारिद्रय रेषेखालील असावी. लाभासाठी दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी दिलेली नोंदणी पत्र किंवा शिधापत्रिका सादर करावी लागेल.

**क.** सदर योजनेचा लाभ अनुसुचित जाती (अ.जा) व अनुसुचित जमाती च्या (अ.ज) सर्व (दारिद्रय रेषेखाली असो किंवा नसो) लाभार्थींना देय होईल.

**ड.** प्रसूती घरी झाली तरीसुध्दा रु.500/- एवढे अनुदान फक्त दारिद्रय रेषेखालील लाभार्थी यांना देय राहील.

**ई.** सदर योजनेचा लाभ देताना अपत्याची व महिलेचे वयाची अट शिथील करण्यात आलेली आहे.

## ◆ आवश्यक कागदपत्रे

अ. अनुसुचित जाती, अनुसुचित जमातीमध्ये समाविष्ठ असल्याबाबतचा जातीचा दाखला

ब. कुटुंब दारिद्रयरेषेखाली असल्याबाबतचा दाखला

क. रहिवासी दाखला

## ◆ अर्ज करण्याची प्रक्रिया

**अर्जपत्र मिळविण्याचे ठिकाण:** उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व)

पात्र गर्भवती लाभार्थीने जवळच्या आरोग्य संस्थेत जाऊन आरोग्य सेविकेकडे प्रसूतीपूर्व नोंदणी करुन घ्यावी व नोंदणी कार्डासोबतच जननी सुरक्षा योजनेचा फॉर्म भरून घ्यावे.

1. उपकेंद्र स्तरावर लाभार्थ्यांची ANM/ASHA मार्फत नोंदणी करणे
2. उपकेंद्र स्तरावरून प्राथमिक आरोग्य केंद्र येथे फॉर्म पाठविणे
3. प्राथमिक आरोग्य केंद्र ते तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय येथे फॉर्म पाठविणे
4. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयास निधी मागणी करणे

## ◆ तालुका आरोग्य अधिकारी संपर्क माहिती

| क्र. | ता.आ.केंद्राचे नाव | ता.आ.अ.यांचे नाव | मोबाइल नं. | ऑफिस इमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | वरोरा | डॉ. प्रतिक बोरकर | ८९७५०५६९९२ | thowarora1234@gmail.com |

| क्र. | ता.आ.केंद्राचे नाव | ता.आ.अ.यांचे नाव | मोबाइल नं. | ऑफिस इमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| २ | चिमूर | डॉ. मोहनीश गिरी | ८६६८९१९२८१ | tho.chimur@gmail.com |
| ३ | नागभीड | डॉ. विनोद मडावी | ७७६९८९३६७२ | tmonagbhid@rediffmail.com |
| ४ | ब्रम्हपुरी | डॉ. मंदोधरा सुखदेवे | ७५८८९६०१५८ | thobpuri@yahoo.com |
| ५ | सिंदेवाही | डॉ. प्रफुल सुने | ८३८१०७३८४५ | thosindewahi2020@gmail.com |
| ६ | सावली | डॉ. आर. आर. चौधरी | ९४२१७२८४३९ | thosaoli@gmail.com |
| ७ | मुल | डॉ. राम बावणे | ९८५०३१९२२५ | tmo_mul@rediffmail.com |
| ८ | पोम्भूर्णा | डॉ. संदेश मामीडवार | ९७६५५५४२१२ | thopombhurna2019@gmail.com |
| ९ | गोंडपिपरी | डॉ. पराग जावळे | ७७७४००४७५ | thogondpipari@gmail.com |
| १० | राजुरा | डॉ. प्रकाश नगराळे | ९४२०४४४८३४ | thorajura@gmail.com |
| ११ | जिवती | डॉ. स्वप्नील टेंभे | ८८०६७०४२४२ | tmophcjiwati@gmail.com |
| १२ | कोरपना | डॉ. स्वप्नील टेंभे | ८८०६७०४२४२ | tmokorpana.gadchandur@gmail.c |
| १३ | चंद्रपूर | डॉ. कोमल मुनेश्वर | ९१३००२५२२७ | tcthochan@gmail.com |
| १४ | बल्लारपूर | डॉ. मीना मडावी | ७७६७८३९०५० | tho.ballarpur2018@gmail.com |

| क्र. | ता.आ.केंद्राचे नाव | ता.आ.अ.यांचे नाव | मोबाइल नं. | ऑफिस इमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १५ | भद्रावती | डॉ. संजय असुटकर | ९५२७५८८९८८ | tho.bhadrawati@gmail.com |

## ◆ योजना राबविण्याकरिता वापरलेले शासन निर्णय

| क्र. | विभाग | क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य विभाग | जसुयो२००६/प्र क्र १७५/कु.क. | २२ डिसेंबर, २००६ |
| २ | सार्वजनिक आरोग्य विभाग | परिपत्रक क्र. राग्रअ२००८/प्र क्र २० | २२ फेब्रुवारी, २००८ |
| ३ | सार्वजनिक आरोग्य विभाग | जसुयो२०१५/प्र क्र ५३४/कु.क. | २१ जानेवारी, २०१६ |

© आरोग्य विभाग - जिल्हा परिषद, चंद्रपूर | जननी सुरक्षा योजना अहवाल